प्रेसनोट दिनांक ११/०२/२०१७

## घरफोडी चोरी करणारे गुन्हेगार निगडी पोलीसांचे जाळ्यात
## ......... निगडी पोलीसांची कामगिरी ..........
## १ किलो ३८० ग्रॅम सोने जप्त

पुणे शहरात होत असलेल्या घरफोडया, वाहन चोरी, चैन चारी अशा गुन्हयांना आळा घालणे कामी तसेच गुन्हयातील आरोपींना अटक करणे कामी मा.पोलीस आयुक्त सो‍ा पुणे शहर यांनी व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी वेळोवेळी सुचना देवून मार्गदर्शन केले त्याप्रमाणे निगडी पोलीस स्टेशनचे हद्दीत गुन्हयांना आळा घालणे कामी अधिकारी व कर्मचारी यांना मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विजयकुमार पळसुले यांनी वरिष्ठांनी दिलेल्या सुचना समजावून सांगून त्यांना वेळोवेळी सापळे लावून, बातमीदारांकडून माहिती काढून कारवाई करणे बाबत सुचना देवुन मार्गदर्शन केले आहे.

वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे इकडिल पोलीस स्टेशन कडील तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी अशा गुन्हयांना आळा घालणे व आरोपींचा शोध घेत असताना निगडी पोलीस ठाणे कडील तपास पथकातील कर्मचारी पोलीस नाईक संदीप पाटील यांना त्यांचे खास बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, घरफोडी चोरी करणारा इसम निळकंठ सुर्यकांत राऊत वय ३६ वर्ष रा. भैरवनाथ हौसिंग सोसायटी २१/१० रुपीनगर तळवडे पुणे याने व त्याचा साथीदार याने .प्लॉट नं.११८ से.नं.२७ धन्वंतरी हॉस्पी जवळ प्राधिकरण निगडी पुणे येथील घरफोडी चोरी केली असून, तसेच त्यांनी पिंपरी चिंचवड परिसरात घरफोडया केल्या आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्याचा दिले पत्त्यावर तसेच बातमीदारा मार्फत शोध घेताना तो चोरीची स्विफ्ट कार एम एच ०६ अेडब्लू ६२४३ वापरत असलेची माहिती मिळाली, तेव्हा त्यांस सापळा लावून, ताब्यात घेवून, त्याचेकडे सखोल तपास केला असता त्याने व त्याचा साथीदार नामे हर्षद गुलाब पवार वय २३ रा.घर नं.१६ बांदल हाईटस गुलाबनगर पिरंगुट ता.मुळशी जि. पुणे यांनी घरफोडी गुन्हे केल्याची कबुली दिली त्याचेकडे तपास करता त्यांनी निगडी पो ठाणे गु.रं.नं.७२०/२०१६ भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने या गुन्हयात अटक करुन त्यांचेकडे तपास केला असता त्यांनी निगडी पोलीस ठाणे कडील घरफोडी चे १)गु.र.नं.६९/२०१६,२)८७/२०१६,३)११९/२०१६,४)१६५/२०१६.५)२७४/२०१६,६)३३०/२०१६,७)८४३/२०१६,८)४२९/२०१६,९)६७१/२०१६, चैन चोरी गु,र,नं.२४/२०१६, तसेच पिंपरी पोलीस ठाणे कडील घरफोडी गु.र.नं. ६७८/२०१६,फरासखाना पोलीस ठाणे कडील वाहन चोरी गु.र.नं.२८/२०१६ , भारती विदयापीठ पोलीस ठाणे कडील वाहन चोरी ४६/२०१६ असे एकूण घरफोडीचे ११ , वाहन चोरी २, चैन चोरी १ असे एकूण १४ गुन्हे उघडकीस आणले असून, त्यांचेकडून १ किलो ३८० ग्रॅम सोने, एक स्विफ्ट कार, एक पल्सर मोटार सायकल असा किं.रु.४२,०६,०००/- चा माल हस्तगत करणेत आला आहे.

दाखल गुन्हयाचा तपास देवेंद्र चव्हाण सहा.पोलीस निरीक्षक हे करीत आहे. आरोपींनी गुन्हे करताना आपले स्वतःची बनावट नावे धारण करुन,बनावट कागदपत्र तयार करुन त्या आधारे वेगवेगळे बॅकांमध्ये वेगवेगळे नावाने खाती उघडून, त्या खात्यांवर चोरीचे सोन्याचे दागिने विक्री करुन आलेले पैसे भरल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. ते सराईत गुन्हेगार असून त्यांचे विरुध्द पुणे शहरात या पुर्वी १७ गुन्हे दाखल दाखल आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त सो‍ा पुणे शहर, मा.सह पोलीस आयुक्त सो‍ा पुणे शहर, मा.अप्पर पोलीस आयुक्त सो‍ा उत्तर प्रादेशिक विभाग श्री शशीकांत शिंदे,मा. पोलीस उपआयुक्त सो‍ा श्री गणेश शिंदे, मा.सहायक पोलीस आयुक्त सो‍ा पिंपरी विभाग श्री.राम मांडुरके यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विजयकुमार पळसुले,पोलीस निरीक्षक गुन्हे श्री.शंकर आवताडे ,सहा.पोलीस निरीक्षक श्री.देवेंद्र चव्हाण,संदिप पाटील,नारायण जाधव, आंनद चव्हाण, बाबा चव्हाण,किसन वडेकर,मच्छिंद्र घनवट, किशोर पढेर, राजेश महाजन,किरण खेडकर, रमेश मावसकर,संजय मरगळे, विलास केकाण म.पो.शि.उगले यांनी केली आहे


निगडी पोलीस स्टेशन,पुणे शहर
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
महाराष्ट्र पोलीस


निगडी पोलीस स्टेशन


निगडी पोलीस स्टेशन